Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक १३] गुरुवार ते बुधवार, एप्रिल १-७, २०२१/चैत्र ११-१७, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १–१ |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | २–४ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १–१७ |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४४४.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai - 400 032, Date 10th March 2021.

No. SPP-2021-U.O.R.17-D-XIV.—

In exercise of the powers conferred by sub-section (*8*) of the Section 24 of the Code of Criminal Procedure, 1973 (Act No. II of 1974), the Government of Maharashtra hereby appoints Adv. Shishir Hiray as “ Special Public Prosecutor ” for conducting the Sessions Case No. 04/2019 in Additional Sessions Court, Darwha, Dist. Yavatmal which is arising out of C.R. No. 638/2018 registered at Darwha Police Station, Dist. Yavatmal.

2. The fees of Adv. Shishir Hiray, as Special Public Prosecutor, shall be paid by Home Department as per the fee schedule agreed by the Home Department.

3. His appointment is strictly subject to the conditions of service laid down in the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984.

4. The Government reserves right to revoke/modify/annul the order without assigning any reasons.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. A. KUMBHOJKAR,
Deputy Legal Advisor *cum*
Deputy Secretary.

# संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४४५.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

**वाचा :** (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुनर्वसन यांची अधिसूचना क्रमांक डीएमयु/२०२०/सीआर-९२/डीआएसएम-१, दिनांक २३ मार्च २०२०.

(२) जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे आदेश क्रमांक गृह/कक्ष-४-२/कावि/२४८/२०२०, दिनांक २३ मार्च २०२०.

(३) उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव-जामोद यांचे पत्र क्र. उविअजजा/भूसंपादन लि./कावि/१६३/२०२१, दिनांक २३ फेब्रुवारी २०२१.

क्र.कावि-कक्ष-७:२-प्रअभूसं-न.क्र.१०२-कावि-४५७-२०२१.—

ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव-जामोद यांनी त्यांच्या संदर्भीय पत्र क्रमांक (३) नुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक ०९/२०१२-१३, मौजा सुलतानपुर (बुडीत क्षेत्र), ता. जळगांव-जामोद, जि. बुलडाणा मध्ये सदर प्रकरणात पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प, धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव यांनी त्यांचेकडे अद्यापपर्यंत निधी प्राप्त न झाल्यामुळे निवाड्यासाठी (३ महिने) मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोव्हीड-१९ या विषाणुमुळे उद्‌भवलेल्या संसर्गजन्य आजाराला महामारी घोषित केले आहे. व त्या अनुषंगाने सदर महामारीचा महाराष्ट्र राज्यात फैलाव होवू नये म्हणून महाराष्ट्र शासनाने संदर्भीय अधिसूचनेद्वारे संपूर्ण राज्यात लॉकडाऊन घोषित केला होता. व तेव्हापासून त्याच्यात वेळोवेळी वाढ सुद्धा करण्यात आली आहे. व याच अधिसूचनेला अनुसरून बुलडाणा जिल्ह्यात सुद्धा जिल्हादंडाधिकारी, बुलडाणा यांचे संदर्भीय आदेश क्रमांक (२) नुसार लॉकडाऊन लागू करण्यात आला होता. व त्यात वेळोवेळी वाढ सुद्धा करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी, लॉकडाऊनमुळे महाराष्ट्र शासनाच्या विभिन्न कार्यालयात कर्मचा-यांच्या अत्यंत कमी उपस्थितीमुळे दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला होता व ही बाब सुद्धा असामान्य परिस्थिती सारखी आहे ;

आणि ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ नुसार भूसंपादनाचे प्रकरणांमध्ये कार्यवाही करण्यात येत आहे. परंतु सदर कार्यवाही करत असतांना कोव्हीड-१९ या संसर्गजन्य विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने घोषित केलेल्या लॉकडाऊनमुळे सदर प्रकरणात कार्यवाही करण्यात अडचण निर्माण झाली आहे. व भूसंपादनाचे विभिन्न टप्प्यावर कार्यवाही करत असतांना भूसंपादन अधिकारी यांना यंत्रणाकडून वारंवार माहिती घ्यावी लागते व यंत्रणांना सुद्धा निधी प्राप्त करून घेणेबाबत त्यांचे वरिष्ठांकडे प्रयत्न करावे लागतात. या सर्व प्रक्रियेमध्ये सुद्धा अडचणी निर्माण झालेल्या आहेत, त्यामुळे संपादक संस्थेला सुद्धा शासनाकडून निधी प्राप्त करून घेण्यास विलंब होत आहे ;

आणि ज्याअर्थी, विधी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाचे २०२०(२) ALT १९९ (SC) Suo Motu Writ Petition (Civil) No. ३ of २०२०, दिनांक २०-३-२०२० (मुदतवाढीकरीता Covid-१९) मधील आदेश/निर्देश या प्रकरणास लागू आहेत असे अभिमत दिले आहे ;

आणि ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे नियम २५ मध्ये ज्या कालावधीत निवाडा देण्यात येईल तो कालावधी जिल्हाधिकारी कलम १९ अन्वये घोषणा प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर, जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल. परंतु त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल अशी तरतूद आहे ;

आणि ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ नुसार समुचित शासन हे जिल्हाधिकारी आहेत ;

आणि ज्याअर्थी, भूसंपादन प्रकरण व्यपगत होवू नये म्हणून कोव्हीड-१९ या विषाणुच्या संक्रमणामुळे झालेली महामारी व त्याचा मानवाच्या दैनंदिन जीवनावर झालेला प्रतिकूल परिणाम व त्याची परिणती म्हणून भूसंपादन प्रक्रियेवर झालेला प्रतिकूल परिणाम, भूसंपादन संपादक संस्थेस प्रकरणात निधी उपलब्ध करून देणा-या सक्षम प्राधिका-यांकडून निधी मिळण्यास होत असलेला विलंब या सर्व बाबी असामान्य असल्याने व विधी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांनी सुद्धा यासर्व बाबींचा भूसंपादनात निवाडा करण्यास मुदतवाढी संबंधी असलेल्या सर्व कायदेशीर बाबींचा व त्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या कोव्हीड-१९ मधील मुदतवाढी संबंधी दिलेल्या आदेशांचा/निर्देशांचा अभ्यास करून निवाडा करण्यास मुदतवाढ देण्यास सकारात्मकता दर्शविली आहे.

त्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे नियम २५ नुसार खालील प्रकरणाला त्याच्या नांवासमोर दर्शविलेल्या कालावधीसाठी निवाडा घोषित करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. | भूसंपादन अधिका-याचे नांव | भूसंपादन प्रकरण क्रमांक | देण्यात येत असलेली मुदतवाढ |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव-जामोद. | ०९/२०१२-१३, मौजे सुलतानपुर, ता. जळगांव-जामोद (बुडीत क्षेत्र) | तीन महिने |

**एस. रामामूर्ती** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
बुलडाणा.

बुलडाणा :
दिनांक २४ फेब्रुवारी २०२१.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४४६.

## जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**संदर्भ :** पोलीस अधिक्षक, वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्र. जिविशा-का.व सु.-प्रतिबंधक-२०२१-७७१, दिनांक १६-०२-२०२१.

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) व (३) लागू करणेबाबत**

**आदेश**

क्रमांक कक्ष ८-अ.का. (गृह)-कावि-१५१-२०२१.—

ज्याअर्थी, वाशिम जिल्ह्यात सद्यस्थितीतील राजकीय वातावरणावरुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच वाशिम जिल्हा जातीयदृष्टया संवेदनशील असून जिल्ह्यात मागील काळात घडलेल्या जातीय घटनांच्या प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सद्यस्थितीत जिल्ह्यात मराठा आरक्षणास मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगीतीस विरोध म्हणून विविध प्रकारची आंदोलने करण्यात येत आहेत. आगामी काळात मराठा क्रांती मोर्चा व मराठा आरक्षण समर्थक विविध संघटना व पक्षांकडून विविध प्रकारच्या आंदोलनात्मक कार्यक्रमांचे आयोजनाची शक्यता नाकारता येत नाही. तसेच केंद्र सरकारने मंजूर केलेले कृषी विधेयक, शेतकरी कर्जमाफी, पीक कर्ज मंजुरी, दुध दरवाढ, वाढती महागाई, शेतक-यांना नुकसान भरपाई तसेच इतर विविध मागण्या संदर्भात विरोधी पक्षाचे वतीने तसेच शेतकरी संघटना इत्यादीचे वतीने मोर्चे, धरणे, आमरण उपोषणे, आत्मदहन, रास्ता रोको ईत्यादी प्रकारचे आंदोलनामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. वाशिम जिल्हा जातीयदृष्टया आणि सण-उत्सवांचे दृष्टीने अत्यंत संवेदनशील असून जिल्ह्यात मागील काळात घडलेल्या जातीय घटनांच्या प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये आणि शांतता व सुव्यवस्था कायम राहावी या करीता दिनांक २०-०२-२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ०६-०३-२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित होणे बाबतचे पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्याअर्थी, मी, शण्मुगराजन एस. (भा.प्र.से.) जिल्हादंडाधिकारी, वाशिम मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मला प्राप्त अधिकाराचा वापर करुन दिनांक २२-०२-२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ०६-०३-२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये आदेश प्रतिबंधात्मक आदेश पारित करीत आहे. सदर आदेश लागू केल्यामुळे वाशिम जिल्ह्यामध्ये खालील गोष्टींकरिता मनाई करण्यात आली आहे.—

(१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, लाठ्या किंवा काठ्या तसेच शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा इतर कोणत्याही तीक्ष्ण वस्तू जवळ बाळगणे.

(२) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ वाहून नेण्यास.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा तशी साधणे जवळ बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे.

(४) व्यक्तींची प्रेते किंवा मनुष्याकृतीच्या प्रतिमा/आकृत्या यांचे बीभत्स प्रदर्शन करणे.

(५) वाद्य वाजविणे, किंकाळ्या फोडणे किंवा जाहीरपणे प्रक्षोभक घोषणा करणे अशा प्राधिकारांच्या मते ज्यामुळे नागरी सभ्यता अगर नितिमत्ता यांस धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्या कृतीमध्ये राज्य प्रशासन उलथून पाडण्याची प्रवृत्ती दिसून येईल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, सोंग आणणे, पत्ते खेळणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलके किंवा कोणत्याही जिन्नस/वस्तू तयार करणे किंवा त्याचा लोकामध्ये प्रसार/प्रचार करणे.

सदर आदेश अंत्ययात्रा, शासकीय सेवेत तैनात कर्मचारी यांना लागू राहणार नाहीत. उपरोक्त आदेश मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये दिनांक २२-०२-२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ०६-०३-२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत कार्यान्वित राहतील.

प्रस्तुत आदेश लाऊडस्पीकर लावून तसेच ड्रम वाजवून तसेच तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, नगर परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर दर्शनी भागावर प्रत लावून लागू करण्यात येईल. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात परिस्थितीनुरुप योग्य कारण असेल व तसे करण्याशिवाय पर्याय नसेल तर अशा परिस्थितीत याबाबत कोणतेही आदेश नजिकच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी विचारविनिमय करून आदेश लागू करण्यास उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच आवश्यक वाटल्यास उपविभागीय दंडाधिकारी यांनी संवेदनशील ठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी/दंडाधिकारी यांच्या नेमणुका कराव्यात.

**शण्मुगराजन एस.** (भा.प्र.से.),
जिल्हादंडाधिकारी,
वाशिम.

वाशिम :
दिनांक २२ फेब्रुवारी २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.